# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक श्री. विजय माधव गवई, वय ४१ वर्ष, व्यवसाय– नोकरी, पद– ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) ग्राम पंचायत कार्यालय पारखेड, अतिरिक्त प्रभार गारडगाव, ता, खामगाव जि. बुलढाणा रा. शामल नगर, शेगाव रोड खामगांव जि. बुलढाणा. |
| लाच मागणी | ३०,०००/– रुपये |
| लाच स्विकारली | तडजोडी अंती १०,०००/– रुपये |
| घटना स्थळ | पंचायत समिती कार्यालय, खामगाव |
| घटना तारीख | दि.०२.०४.२०२६ |

**थोडक्यात हकीकत :–** यातील तक्रारदार यांची गावाबाहेर असलेल्या गावठाण शेतातील जागेची नमुना ८–अ ची नोंद रद्द करून सदर नोंदीचा दुरूस्ती अहवाल वरिष्ठांना पाठविण्यासाठी लोकसेवक श्री. विजय गवई, ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) ग्राम पंचायत कार्यालय गारडगाव हे ३०,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे प्राप्त झाली होती.

त्यानुसार दिनांक २५.०२.२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री. विजय गवई यांनी तक्रारदार यांच्या गावाबाहेर असलेल्या गावठाण शेतातील जागेची नमुना ८–अ ची नोंद रद्द करून सदर नोंदीचा दुरूस्ती अहवाल वरिष्ठांना पाठविण्यासाठी ३०,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती १०,०००/–रूपये लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली होती.

आज दि.०२.०४.२०२६ रोजी पंचायत समिती कार्यालय, खामगाव ता.खामगाव जि. बुलढाणा येथे सापळा कार्यवाही आयोजीत केली असता तक्रारदार यांचेकडून पंचा समक्ष १०,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. त्यावरुन आलोसे श्री.विजय माधव गवई, ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) ग्राम पंचायत कार्यालय पारखेड, अतिरिक्त प्रभार गारडगाव ता. खामगाव यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदर कार्यवाही :–**

१ .मा.श्री.बापू बांगर,पोलीस अधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती,परिक्षेत्र अमरावती.
मों.नं.९०११३२३४२६

२ .मा.श्री.सचिंद्र शिंदे,अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती,परिक्षेत्र अमरावती.
मों.नं.९७६४२१०४८५

३ .मा.श्री.भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,बुलढाणा.
मों.नं.९५५२५२०१८८

यांचेमार्गदर्शना खाली, श्री.विलास गुसिंगे पोलीस निरीक्षक व सापळा पथक पोहेकॉ दिपक जाधव, पो.ना.जगदीश पवार, पोकॉ.रंजीत व्यवहारे, शैलेश सोनवणे, चापोहेका नितीन शेटे, चापोना अर्शद शेख सर्व ॲन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा.येथे दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व व्हाटस अप क्रमांक ९४०५०९१०६४ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधून तक्रार करण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी केले आहे.

( विलास गुसिंगे )
पोलीस निरीक्षक,
तथा सापळा अधिकारी
ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा